प्रेस नोट दि. १२/०९/२०२३

# १४ वर्षाच्या मुलाचे अपहरण करणाऱ्या तीन आरोपींना "गुन्हे शाखा युनिट-४ पिंपरी चिंचवड" यांनी अडीच तासात ठोकल्या बेडया धारधार शस्त्र जप्त करुन अपहरण ग्रस्त मुलाची केली सुटका

हकिगत अशी की, दिनांक- १२/०९/२०२३ रोजी सुमारे ०७:०० वा. हिंजवडी पोलीस ठाणे हद्दितील ताथवडे येथिल एका भंगार व्यवसायिकाच्या १४ वर्षाचे मुलाचे झेन गाडी मधुन आलेल्या तीन इसमांनी अपहरण केले असले बाबत पोहवा/मोहम्मद गौस नदाफ यांना माहिती मिळाल्याने व सदरचा प्रकार हा गंभीर स्वरुपाचा असल्याने मा. पोलीस आयुक्त सो, विनयकुमार चौबे सो, व आम्ही स्वतः गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर आवताडे आणि सर्व अधिकारी व पोलीस अंमलदार यांना तात्काळ घटनास्थळी जावुन तपास करण्याचे आदेश दिले होते.

त्याअनुंषागाने गुन्हे शाखा युनिट-४ चे सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी मुलाचे अपहरण केले ठिकाणाचे सी.सी.टी.व्ही फुटेजची पाहणी केली असता त्यात तीन इसम हे एका निळया रंगाचे झेन गाडी मध्ये अपहरण केलेल्या मुलास घेवुन जात असल्याचे दिसत होते. त्याच दरम्यान गुन्हे शाखा युनिट-४ ने अपहरण केलेल्या मुलाचे काका यास ताब्यात घेवुन त्याचे कडे चौकशी करुन त्याचे कडुन माहिती काढण्यास सांगितले होते. त्याच दरम्यान सदर अपहरण झालेल्या मुलांच्या काकास वेगवेगळया मोबाईल क्रमांका वरुन फोन करुन एका इसमाने **"३० लाख रुपयाची खंडणी दे नाही तर तुमच्या मुलाचे हात-पाय तोडुन त्यास मारुन टाकतो"** अशा प्रकारचा खंडणीचा फोन करत होते.

तेव्हा अपहरण करणाऱ्या इसमां बाबत मिळालेल्या बातमीदारा कडुन व पोशि/ प्रशांत सैद यांनी केलेल्या तांत्रिक विश्लेषणा वरुन अपहरण करणारे इसम हे सासवड परिसरात असल्याबाबत माहिती प्राप्त झाल्याने आम्ही लागलीच सपोनि देशमुख, दरोडा विरोधी पथक व पोउपनि रायकर, गुन्हे शाखा युनिट-४ यांची दोन वेगवेगळी पथके तयार करुन सदर ठिकाणी रवाना केली. तसेच त्यादरम्यान आम्ही वपोनि शंकर आवताडे यांनी पोलीस उप-अधिक्षक बरडे, स्थानिक गुन्हे शाखा, पुणे यांचे पोनि अविनाश शिळीमकर, सासवड पो ठाण्याचे पोनि जाधव, राजगड पो ठाण्याचे पोनि आण्णा घोलप यांना देखिल संपर्क करुन त्यांना सविस्तर प्रकार सांगुन आरोपींचे वर्णन सांगुन तात्काळ नाकाबंदी लावण्यास सांगितले. त्यांनतर गुन्हे शाखेच्या दोन्ही पथक, स्थानिक गुन्हे शाखा, पुणे व सासवड पोलीस ठाणे यांनी योग्य तो समन्वय साधुन तात्काळ प्रतिसाद दिल्याने आवघ्या अडीच तासात सापळा लावुन आरोपी नामे **१) तेजस ज्ञानोबा लोखंडे, वय-२१ वर्षे, रा-दत्त मंदिर शेजारी, मारुंजीगाव, पुणे २) अर्जुन सुरेश राठोड, वय-१९ वर्षे, रा-दत्त मंदिर शेजारी, मारुंजीगाव, पुणे ३) विकास संजय मस्के, वय-२२ वर्षे, रा- शिवार वस्ती, भुमकर चौक, पुणे.** या खंडणीखोर तीन आरोपींना शिताफीने झेन गाडीसह ताब्यात घेवुन त्यांचे तावडीतुन अपहरण झालेल्या मुलाची सुटका करण्यात यश मिळाले आहे.

तसेच सदर आरोपींकडे मिळुन आलेल्या गाडीची पाहणी केली असता त्यात **तीन मोबाईल फोन, ०१ छऱ्याचे पिस्टल, ०१ अडीच फुट लांबीचा कोयता, ०१ सुरा, छन्नी, हातोडा, ०२ मास्क** असा मुद्देमाल जप्त केला असुन त्यांचे कडे प्राथमिक चौकशी केली असता सदर आरोपी यांनी अपहरण केलेल्या मुलाचे वडीलांबाबत माहिती काढली होती की त्याचा भंगाराचा व्यवसाय असुन त्याचे कडे खुप पैसे आहेत त्याचे मुलाचे अपहरण केले तर खुप पैसे मिळु शकता त्यासाठी त्यांनी पाच दिवस सदर मुलाचे अपहरण करण्यासाठी रेखी केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तसेच त्यांना हॉटेलचा व्यवसाय सुरु करण्यासाठी पैशाची आवश्यकता असल्याने त्यांनी सदर मुलाचे अपहरण केले असल्याचे तपासात निष्पन्न होत आहे. तसेच सदर आरोपींनी खंडणी मागण्याकरिता वापरलेले मोबाईल फोन हे भुमकर चौक व मारुंजी परिसरातुन चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले असुन सदर आरोपींना पुढील तपासकामी हिंजवडी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-१०६६/२०२३ भा.दं.वि.कलम-३६४ (अ) या गुन्हयाचे तपासकामी ताब्यात देण्यात आले आहे.

---------------------------------------------ooo---------------------------------------------

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. विनयकुमार चौबे सो, सह पोलीस आयुक्त मा. श्री. डॉ. संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. वसंत परदेशी सो, पोलीस उप-आयुक्त, मा. श्री. काकासाहेब डोळे सो, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, स्वप्ना गोरे मॅडम, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे मा. श्री. सतिष माने सो, सहा. पोलीस आयुक्त, मा. श्री. हिरे सो, यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४, वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर आवताडे, दरोडा विरोधी पथक, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिपक शिंदे, सपोनि, अंबरिष देशमुख, दरोडा विरोधी पथक, सपोनि सिद्धनाथ बाबर, पोउपनि गणेश रायकर, सहा.पो.उप.नि. नारायण जाधव, संजय गवारे, दादा पवार, पोहवा/ प्रविण दळे, तुषार शेटे, मोहम्मद गौस नदाफ, रोहिदास आडे, पोना/ वासुदेव मुंडे, सुरेश जायभाये, पोशि/ प्रशांत सैद, सुखदेव गावंडे तांत्रिक विश्लेषण विभाग गुन्हे शाखा चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय तुंगार, स.पो.नि. सागर पानमंद, पोहवा/नागेश माळी, पोपट हुलगे यांनी केली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे
पिंपरी चिंचवड